# शाळा व्यवस्थापन समिती

## माझी शाळा – माझी जबाबदारी







ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शाळा व्यवस्थापन समिती रचना



- सदस्यसंख्या– १२ ते १६ (मुलांच्या पटसंख्येनुसार)
- समिती कार्यकाल – २ वर्षे. २ वर्षांनंतर पुनर्गठन करणे.
- ७५% पालक व २५% इतर सदस्य
- एकूण ५०% महिला

१. सर्व शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व अनुदानित शाळांत 'शाळा व्यवस्थापन समिती' स्थापन करणे कायद्याने बंधनकारक.

२. एकूण सदस्यांपैकी ७५% सदस्य बालकांचे माता–पिता आणि पालक यांच्यापैकी असतील.

३. २५% सदस्य हे स्थानिक प्राधिकरणाचे निवडून आलेले प्रतिनिधी, व्यवस्थापनाचे सदस्य, शिक्षणतज्ज्ञ किंवा बालविकास तज्ज्ञ, शिक्षक यांपैकी असतील.

४. शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांत शाळा व्यवस्थापन समिती, अध्यक्षपदावरील व्यक्ती बालकांचे माता व पिता आणि अनुदानित शाळांच्या बाबतीत व्यवस्थापनाचा प्रतिनिधी असेल.

५. मुख्याध्यापक हे पद्सिद्ध सचिव राहतील.

६. दोन विद्यार्थी (पैकी किमान एक मुलगी) स्वीकृत सदस्य असतील. यांना मतदानाचा अधिकार नसेल.

७. दुर्बल व वंचित गटांतील बालकांचे माता व पिता तसेच तीन वेगवेगळ्या स्तरांवर (उच्च, मध्यम व कमी) नैपुण्य दाखविणाऱ्या बालकांचे माता–पिता यांना सुद्धा पुरेसे प्रतिनिधित्व द्यावे.

## पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान – FLN मध्ये शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका.

**FLN मध्ये SMC ची भूमिका**

- भाषा व गणितीय साक्षरता वाढीसाठी एक कालबद्ध कार्यक्रम राबविणे.
- शालेय नियोजन विद्यार्थी संपादणूक मूल्यमापन यावर बैठकीत चर्चा करावी.
- विद्यार्थी उपस्थिति १००% राहण्यासाठी आवश्यकतेनुसार गृहभेटी घ्याव्यात.
- अपेक्षित गुणवत्ता वाढीमध्ये येणाऱ्या अडचणींवर समितीच्या बैठकीत चर्चा करून उपाययोजना सुचविणे.

# शाळा व्यवस्थापन समिती - कार्ये आणि जबाबदारी

(RTE २००९ कलम २२ नुसार )

- शाळेच्या शैक्षणिक कार्यावर देखरेख ठेवणे.
- शाळा विकास योजना (आराखडा) तयार करणे.
- शाळेला प्राप्त होणाऱ्या विविध अनुदानांच्या विनियोगावर देखरेख ठेवणे. शाळेचा वार्षिक जमाखर्च तयार करून, लेखे तयार करण्याची कार्यवाही करणे.
- शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेणे.
- बालकांचे हक्क याचा प्रचार व प्रसार करणे. या संदर्भातील राज्य शासन स्थानिक प्राधिकरण, शाळा, माता–पिता आणि पालक यांची कर्तव्ये यांविषयी जनतेला सोप्या शब्दांत कल्पक उदाहरणांतून माहिती देणे.
- शाळेसाठी पायाभूत सुविधा व साधनसामग्री उपलब्धतेची कार्यवाही करणे.
- शाळाबाह्य बालकांचा शाळाप्रवेश व त्यांच्या विशेष प्रशिक्षण अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.
- शालेय पोषण आहार व इतर शासकीय योजना अंमलबजावणीवर सनियंत्रण ठेवणे.



- शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे, त्यांच्या अध्ययन सुविधांचे सनियंत्रण करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे.
- बालकांची १००% पटनोंदणी व १००% उपस्थिती यांमध्ये सातत्य राहील यासाठी दक्षता घेणे.
- जनगणना, निवडणूक व आपत्ती व्यवस्थापन यांशिवाय इतर अशैक्षणिक कामांचा बोजा शिक्षकांवर पडणारा नाही याचे सनियंत्रण करणे.
- शाळाबाह्य व विशेष गरजा असलेली बालके यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व शाळेत टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.



# गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी मुख्याध्यापक व शिक्षक जसे जबाबदार आहेत, तसेच शाळा व्यवस्थापन समिती सुद्धा जबाबदार आहे.

- गुणवत्ता म्हणजे फक्त शैक्षणिक गुणवत्ता असा मर्यादित अर्थ नसून सहभागाची समान संधी, सुरक्षिततेची हमी आणि प्रगतीची शाश्वती अपेक्षित आहे.
- शालेय विकास आराखड्याप्रमाणेच प्रत्येक शाळेचा शैक्षणिक विकास आराखडा असावा.
- वर्गातील १००% विद्यार्थ्यांना त्या वर्गातील किमान ७५% क्षमता प्राप्त होण्याकरिता याकरिता शाळा व्यवस्थापन समितीने शाळेला आवश्यक ते सहकार्य करावे.
- प्रत्येक तीन महिन्यांनी वर्गनिहाय प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययनस्तर निश्चित करण्यात यावा; त्यानुसार विद्यार्थिनिहाय कृतिकार्यक्रम राबविण्यासाठी मदत करावी.
- मुख्याध्यापक व शिक्षकांनी अध्ययनस्तरातून उपलब्ध झालेल्या माहितीचे सादरीकरण करून गुणवत्ता वाढीसाठी वर्गनिहाय/विद्यार्थिनिहाय नियोजन करावे व प्रत्येक तीन महिन्यांनी आढावा घ्यावा व योग्य ते बदल करावेत.
- सहशालेय उपक्रमांमध्ये SMC सदस्यांचा सक्रिय सहभाग असावा. उदा. विविध गुणदर्शन, क्रीडा महोत्सव व शैक्षणिक सहल इत्यादी उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत करावी.
- शाळा व्यवस्थापन समिती बैठकीमध्ये मुख्याध्यापकांनी स्वत: अथवा तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने DIKSHA APP चा वापर व त्याच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम यावर चर्चा करावी.
- पालकांचे WhatsApp ग्रुप करून पालकांना शाळेतील विविध उपक्रमांची माहिती होण्यासाठी सदस्यांनी मदत करावी.
- शाळेमध्ये ई-लर्निंग सुविधा उपलब्ध होण्यासाठी सदस्यांनी मदत करावी.
- शाळास्तरावर शिक्षकांना येणाऱ्या शैक्षणिक समस्या निराकरणासाठी सदस्यांनी सहकार्य करावे.
- शालेय परिसर सुरक्षितता हमी – शाळा, शालेय इमारत आणि शालेय परिसर हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सुरक्षित आणि स्वच्छ असेल याची खात्री सदस्यांनी करावी.
- दरमहा शालेय पोषण आहार, किचन भेट आणि त्यामध्ये आढळलेल्या मुद्द्यांवर बैठकीमध्ये चर्चा करावी.
- विद्यार्थी प्रगती, CCE, अध्ययन स्तर यांबाबत प्रत्येक बैठकीत चर्चा करावी.
- शाळा व्यवस्थापन समितीने दर महिन्याला शाळा, वर्ग, शालेय परिसर इत्यादींवर देखरेख ठेवावी.
- दरमहा होणाऱ्या बैठकीमध्ये सूचना पेटीतील तक्रारींचे वाचन करून उपाययोजना कराव्यात.
- दर सहा महिन्यांनी वर्गनिहाय पालक सभेचे आयोजन SMC च्या मदतीने करावे.

# बालकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणामध्ये शाळा व्यवस्थापन समिती (SMC) ची भूमिका

| मूलभूत हक्क | शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका |
| --- | --- |
| १. जीवन जगण्याचा हक्क  | • शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आरोग्यदायी सवयी लावण्यासाठी उपक्रमांची आखणी करणे, शाळेत आरोग्य सुविधा पुरविणे.<br>• बालकांचे आरोग्य उत्कृष्ट राहण्यासाठी पालकांमध्ये जाणीवजागृती करणे.<br>• बालकांचा आत्मसन्मान जोपासण्यासाठी समाजामध्ये जाणीवजागृती करणे.<br>• बालकाला सामाजिक सुरक्षितता मिळण्यासाठी नागरिकांना उद्बोधित करणे. |
| २. विकासाचा हक्क  | • प्राथमिक शिक्षणाची मोफत सुविधा पुरविली जाईल याची सुनिश्चिती करणे.<br>• बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सहशालेय व अभ्यासपूरक उपक्रम राबविण्यामध्ये सहभाग घेणे.<br>• खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बालकांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देणे.<br>• मुक्त समाज जीवनात बालकाला एक कार्यक्षम नागरिक बनवू शकेल असे शिक्षण देण्यासाठी उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेणे.<br>• बालकांना आपली कौशल्ये विकसित करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे. |
| ३. संरक्षणाचा हक्क  | • बालकाचे शिक्षण संरक्षित वातावरणात व्यवस्थित पार पडेल यासाठी शाळेतील शिक्षण प्रक्रियेत सहभाग नोंदविणे.<br>• बालक व्यसनांपासून दूर रहावे यासाठी शालेय परिसर व्यसनमुक्त ठेवण्यामध्ये सक्रिय सहभाग घेणे.<br>• शालेय शिक्षण प्रक्रियेत मुलगा-मुलगी असा भेदभाव होणार नाही यासाठी पालकांमध्ये व ग्रामस्थांमध्ये जाणीवजागृती करणे.<br>• बालमजुरी तसेच बालकांचे लैंगिक शोषण होणार नाही यासाठी सक्रिय राहणे.<br>• बालक कोणत्याही शोषणाला बळी पडणार नाही याची दक्षता घेणे. |
| ४. सहभागितेचा हक्क  | • विविध घटना, प्रसंग यामध्ये बालकांचे दृष्टिकोन समजून घेण्यासाठी पालक व ग्रामस्थ यांच्यामध्ये जागृती करणे.<br>• बालक आपली अभिव्यक्ती भयमुक्त होऊन करू शकेल अशी शालेय वातावरणनिर्मिती करणे.<br>• आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी बालकांना सहकार्य करणे.<br>• विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकांमध्ये जाणीवजागृती निर्माण होईल यासाठी सक्रिय राहणे. |

# बालकांचे हक्क व सुरक्षितता संदर्भातील कायदे व ठळक तरतुदी

| कायदा | ठळक तरतुदी |
|---|---|
| **बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायदा २०१२** | • बालकाचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण आणि गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी कायदा.<br>• बालकाच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या व्यक्तीकडून अपराध घडल्यास गंभीर अपराध समजला जाईल.<br>• गुन्हा घडल्यास व घडल्याची माहिती मिळाल्याबरोबर त्याबद्दल प्रशासन/पोलीस/बाल कल्याण समिती/चाईल्ड लाईन यांना माहिती देणे बंधनकारक.<br>• बालकाबद्दलची माहिती गुप्त ठेवावी. |
| **बालकामगार (प्रतिबंध व नियमन सुधारित कायदा २०१६)** | • वय वर्षे १४ पर्यंत कोणत्याही बालकास काम करण्यास बंदी (कुटुंब व्यवसायात मदत व चित्रपट, सिरियल व खेळ यामध्ये अटीच्या अधीन राहून सहभाग)<br>• बालकामगार आढळल्यास प्रथमतः सरपंच, गाव, बाल संरक्षण समितीने पालकाशी संवाद साधावा.<br>• तक्रार करण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पोलीस – १०० व चाईल्ड लाईन नं. १०९८ शी संपर्क साधावा. |
| **बालविवाह प्रतिबंध कायदा २०१६** | • वयोमानानुसार मुलाचे विवाह योग्य वय २१ वर्षे पूर्ण व मुलीचे १८ वर्षे पूर्ण असावे.<br>• निर्धारित केलेल्या वयाच्या अगोदर विवाह झाल्यास बालविवाह समजला जातो.<br>• बालविवाह लावण्यास कारणीभूत असणाऱ्या सर्व व्यक्ती कायद्याने शिक्षेस पात्र आहेत.<br>• ग्रामसेवक हा विवाह प्रतिबंधक अधिकारी असेल तर अंगणवाडी ताई सहायक म्हणून काम करतील.<br>• बालविवाह रोखण्यासाठी पोलीस, चाईल्ड लाईन, बाल कल्याण समिती, जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |
| **माहिती व तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८** | • इंटरनेटच्या माध्यमातून अश्लील गोष्टी, मजकूर पाठविणे.<br>• फेक प्रोफाईल, खाजगी अवयवांचे फोटो प्रसारित करणे.<br>• बदनामीकारक शब्द, हॅकिंग करणे, सायबर दहशत निर्माण करणे, बालकाविषयीचे अश्लील साहित्य इत्यादी बाबी कायद्याने गुन्हा आहेत; याबाबत मुले अथवा त्यांचे पालक आजही मोकळेपणे तक्रार करताना दिसून येत नाहीत. शाळा व्यवस्थापन समितीने याबाबत जनजागृती करावी. |